जयवंत दळवी यांच्या नाटकातील व्यक्तिरेखांच्या विविधतेचा शोध

प्रा.डॉ.आनंद वारके
मराठी विभाग,
दूधसाखर महाविद्यालय,बिद्री
ता.कागल,जि.कोल्हापूर ४१६२०८

उद्दिष्ट :

जयवंत दळवी यांच्या नाटकातील व्यक्तिरेखांची विविधता पाहणे.

व्याप्ती :

जयवंत दळवी यांच्या सर्व नाटकांच्या आधारे हा शोध घेतलेलाआहे .

जयवंत दळवी साठोत्तरी नाट्यसृष्टीतील एक महत्त्वाचे नाटककार आहेत. त्यांनी संध्याछाया , बॅरिस्टर, सूर्यास्त, पुरुष , सावित्री , कालचक्र ,स्पर्श,किनारा अशी नाटकेलिहिलेली आहेत.जयवंत दळवी यांच्या नाटकांमध्ये विपुल व्यक्तिरेखा आहेत. त्यांचे स्वभावही वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. काही वृद्ध, तरूण, बाल, मध्यमवर्गीय, कौटुंबिक, राजकीय इत्यादी व्यक्ती विविधतेबरोबर सुशिक्षित, कमी शिकलेल्या, सुसंस्कृत, वेडसर, मतिमंद, भ्रमिष्ट, वेड्या, जीवनात अयशस्वी झालेल्या, सुष्ट, दुष्ट स्वभावाच्या, स्थिर-अस्थिर स्वरूपाच्या, ब्राम्हण, दलित, मराठा या जाती धर्मातील व्यक्तिरेखा आढळतात. त्याचबरोबर वेगवेगळी भाषा बोलणारी पात्रेही त्यांच्या नाटकांतून पहावयास सापडतात. त्यांच्या नाटकांत दिसून येणारी व्यक्तिरेखांची विविधता पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. वृद्ध, तरूण व बाल व्यक्तिरेखा :

दळवींनी वृद्ध व्यक्तींच्या जीवनातील नाट्य आपल्या काही नाटकांमधून मांडले आहे. उतारवयातील व्यक्तीजीवन त्यांना महत्त्वाचे वाटते. याबद्दल म. द. हातकणंगलेकर म्हणतात,''उतारवयातील माणसांची पक्व होत असलेली निराशा आणि दुःख हा दळवींच्या अनुभवाचा एक खास भाग आहे.''१'संध्याछाया' व 'सभ्य गृहस्थ हो!' या नाटकापासून 'संसारगाथा' या नाटकांपर्यंत अनेक नाटकांतून दळवींनी वृद्ध व्यक्तींच्या जीवनातील ही निराशा, दुःख, आशा, आकांक्षा, अपेक्षा, अपेक्षाभंग यातून निर्माण होणारी त्यांची मानसिक कोंडी चित्रित केली आहे. म्हणून डॉ. भालचंद्र खांडेकरांनी ''दळवींच्या नाटकात पोक्त किंवा वृद्ध व्यक्तींना केंद्रस्थान आहे''२ असे म्हटले आहे. त्यांच्या पहिल्या 'सभ्य गृहस्थ हो!' या नाटकातील सभ्य गृहस्थ उतार वयातील आहेत. 'संध्याछाया' मधील नाना व नानी, 'सूर्यास्त' मधील आप्पाजी व जनाई, 'महासागर' मधील दिगंबरची आई व गंगूकाकी, 'दुर्गी' तील मोरोबा, बाबूराव, दुर्गी व माई, 'पुरुष' मधील अय्या, 'हरि अप् हरी!' मधील रामराव व काकू, 'पर्याय' मधील अण्णा, वळवणे, माई, चित्राचे वडील बाबा, रामदास या सर्व व्यक्तिरेखा पन्नाशी ओलांडलेल्या, साठीकडील अशा आहेत. यातील काही व्यक्तिरेखा नाटकाच्या केंद्रस्थानी आहेत. याशिवाय दळवींच्या नाटकांतील या वृद्ध व उतारवयातील व्यक्तिरेखांचे महत्त्व वेगळ्या पद्धतीने विशद करताना डॉ. भालचंद्र खांडेकर म्हणतात, '' 'संध्याछाया' मधील नाना, नानी, 'दुर्गी' मधील दुर्गी, बाबूराव, 'स्पर्श' मधील रामराव, सीता, 'कालचक्र' मधील आई बाबा या व्यक्ती माणसांसाठी, त्यांच्या प्रेमासाठी आसुसलेल्या आहेत. हळव्या झाल्या आहेत. विशेषतः या वयात आपण एकाकी नसावे, कुणाचा तरी

आधार आपल्याला हवा. घरातल्या मंडळींमध्ये आपल्याला जागा असावी, ती ही आपुलकीची, किमान आपल्या अस्तित्वाची जाण ठेवणारी, इतक्या माफक अपेक्षेवर अशी माणसं जगत असतात. जीवन नको नको झाले तरी जगावं असं वाटावं हा मानवी स्वभाव आहे. पण हे उरलेलं जीवन हलाखीचं नसावं, याच आशेवर या व्यक्ती दिवस रेटीत असतात. वृद्धत्वाकडे झुकलेल्या, वृद्धत्व जगणाऱ्या व्यक्तीच्या मनाचा विचार करायला पुष्कळदा तरूण मंडळींना वेळच मिळत नाही. कारण तरुणांना त्यांच्या संसारातल्या उमेदी, त्यांचे प्रॉब्लेम्स्, त्यांची मुलं, त्यांचे शिक्षण याकडे अधिक लक्ष पुरवावं लागतं. घरातले वृद्ध हे मरत नाहीत म्हणून जगत असतात, आणि ते जगत असतात म्हणून त्यांना खायला प्यायला द्यावं लागतं, घालावं लागतं. या कर्तव्याच्या जाणिवेनंच वृद्धांकडे पाहिलं जातं, अशी वस्तुस्थिती अनेकांच्या बाबतीत आढळून येते. आपापल्या दैनंदिन व्यापात घरातल्या वृद्धमंडळींकडे आपुलकीने पाहणारे थोडेच.''३खांडेकरांच्या या मतावरून दळवींनी रेखाटलेल्या वृद्ध व उतारवयातील व्यक्तिरेखांचे महत्त्व लक्षात येईल. त्यांच्या नाटकांत तरुण व्यक्तिरेखाही आहेत. 'सभ्य गृहस्थ हो!' मधील गोपीनाथ, 'संध्याछाया' मधील दिनू, विनय, श्याम देशपांडे, 'बॅरिस्टर' मधील बॅरिस्टर, भाऊराव, राधाक्का, 'सूर्यास्त' मधील लाल्या, शालन, गायकवाड, 'महासागर' मधील दिगंबर, वसंत, सुराणा, चंपू, रेहमान, घनश्याम, 'दुर्गी' तील संजीव, हेमा, 'पुरुष' मधील अंबिका, मथू, सिद्धार्थ, गुलाबराव, 'सावित्री' मधील श्यामू, अपर्णा, मानसी, बायजी, बाळाराव, केटी ही सर्व तरुण, प्रौढ अशी आहेत. 'मुक्ता' मधील श्रीकांत, केशर, बेबी, देसाई मास्तर, सगुण, 'हरि अप् हरी!' मधील हणमंत, श्रीकृष्ण, राधा, सोमेश्वर, 'पर्याय' मधील चित्रा, कमल , शिनू, सुमन, 'किनारा' मधील यदु, श्यामा, शैला काळे, 'कालचक्र' मधील राघव, शरद व विश्वनाथ, 'अपूर्णांक' मधील कांचनमाला, 'नातीगोती' मधील काटदे, शैलजा, पंडीत, 'लग्न' मधील रिंकी, सुबोध, सदानंद, देविका, 'संसारगाथा' मधील जयप्रकाश वेणू या त्यांच्या नाटकांतील व्यक्तिरेखा तरूण, प्रौढ अशा प्रकारच्या आहेत. त्यांच्या काही नाटकांत वृद्ध व्यक्तिरेखा केंद्रस्थानी आहेत तशा काही नाटकांत तरूण व्यक्तिरेखा केंद्रस्थानी आहेत. दळवींच्या नाटकांतील या तरूण व्यक्तिरेखांचे महत्त्व विशद करताना डॉ. भालचंद्र खांडेकर म्हणतात,''दळवींनी तरूण व्यक्ती आणि तिच्या भोवतीचे प्रश्न मांडले आहेत.''४

त्यांच्या काही नाटकांत बाल व्यक्तिरेखाही आढळतात. 'संध्याछाया' मधील शर्मिला, 'बॅरिस्टर' मधील पंपूशेठ, 'सावित्री' मधील सतीश, 'स्पर्श' मधील सीताबाईची नात नीता, अशा काही बाल व्यक्तिरेखाही त्यांच्या नाटकांत येतात. या व्यक्तिरेखा किरकोळ वाटत असल्या तरी दळवींनी त्या आशयानुरुप योजल्या आहेत. अशा प्रकारे वेगवेगळ्या वयातील व्यक्तिरेखा दळवींनी आपल्या नाटकांत योजल्या आहेत. त्यांच्या नाटकांची खरी मदार वृद्ध व्यक्तीवर असली तरी तरूण व बालव्यक्तिरेखा नजरेआड करून चालत नाहीत.

२. मध्यमवर्गीय व सामान्य व्यक्तिरेखा :

जयवंत दळवी यांच्या नाटकांतील व्यक्तिरेखा मध्यमवर्गीय व सामान्य अशा आहेत. त्यांनी केवळ मध्यमवर्गीयांच्या समस्या आपल्या नाटकांतून मांडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या नाटकांतील व्यक्तिरेखा मध्यमवर्गीय तर आहेतच पण त्याचबरोबर बऱ्याच सामान्य व्यक्तिरेखाही त्यांच्या नाटकांत आढळतात. 'सभ्य गृहस्थ हो!' मधील लिमये गुरुजी तर जोशी पोष्ट

मास्तर आहेत. 'संध्याछाया' मधील नाना रेल्वेत ऑडिटर होते. 'बॅरिस्टर' मधील रावू बॅरिस्टर आहे. 'सूर्यास्त' मधील आप्पाजींचा मुलगा मुख्यमंत्री आहे. 'महासागर' मधील घनश्याम नोकरी करतो, दिगंबर विमा एजंट आहे, 'दुर्गी' तील बाबूरावांचे नागपूरला दुकान होते. 'पुरुष' मधील अण्णा माध्यमिक शिक्षक आहेत. अंबिका शिक्षिका आहे. 'सावित्री' मधील श्यामू प्राध्यापक, अपर्णा नोकरी करते. 'मुक्ता' मधील श्रीकांत कामत, घाटे, दाभोळकर, देसाई हे शिक्षक आहेत. बेबी नर्स आहे. 'पर्याय' मधील माई शिक्षिका आहे. 'स्पर्श' मधील रामराव वकील आहेत. 'किनारा' मधील 'जिजी' ही मूळची श्रीमंत आहे. त्यामुळे तिचे पती शिरूभाऊही मध्यमवर्गीय झाले आहेत. 'कालचक्र' मधील राघव करमरकर प्राध्यापक, इरावती प्राध्यापिका आहे. 'नातीगोती' मधील काटदरे व शैलजा नोकरी करतात, 'लग्न' मधील अचला व भाई पूर्वी नाटकात काम करणारे नट होते. आता रिंकी मॉडेलिंग व देविका नाटकात काम करतात. 'अपूर्णांक' मधील कांचन ही निवृत्त नटी आहे. अशा प्रकारे त्यांच्या नाटकातील व्यक्तिरेखा मध्यमवर्गीय जीवन जगणाऱ्या आहेत.

मध्यमवर्गीय व्यक्तिरेखांबरोबर काही सामन्य व्यक्तिरेखाही त्यांच्या नाटकांत येतात. 'संध्याछाया' मधील म्हादू, 'बॅरिस्टर' मधील गणोजी, संतू न्हावी, 'सूर्यास्त' मधील गायकवाड व 'पुरुष' मधील सिद्धार्थ दलित आहेत. 'दुर्गी' तील मोरोबा सामान्य आहे. 'पर्याय' मधील चित्राचे वडील साधारण जीवन जगणारे आहेत. 'किनारा' मधील फडके, 'अपूर्णांक' मधील अनंतराव, 'संसारगाथा' मधील मालुताई, दत्ताण्णा, लालजी, प्रकाश व वेणू इत्यादी व्यक्तिरेखा सामान्य आहेत. याबद्दल स्वतः दळवी म्हणतात, ''माझ्या नाटकामधील पात्रे ही सर्वसाधारणपणे सामान्य वाटतील अशी माणसे आहेत. तुम्हाला तिथे अगदी 'एक्स्ट्रा ऑर्डेनरी' माणसं आढळणार नाहीत.''५

३. प्रातिनिधिक व्यक्तिरेखा :

दळवींच्या नाटकांतील व्यक्तिरेखा प्रातिनिधिक स्वरुपाच्या आहेत. समस्या या सर्वांच्या सारख्याच असू शकतात. हे दाखविण्यासाठी या व्यक्तिरेखा आल्या आहेत. समाजातील विविध व्यक्तींचे प्रतिबिंब त्यांच्या नाटकांतून दिसते. 'संध्याछाया', 'कालचक्र' या नाटकातील अनुभव प्रत्येक व्यक्तीस येत असतो. प्रत्येक तरुणाला अपघात वगळता कालचक्राप्रमाणे वृद्धत्व येणार असते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात येणारी समस्या नाना नानीच्या रुपाने व आईबापाच्या रुपाने दळवींनी 'संध्याछाया' व 'कालचक्र' या नाटकांत चित्रित केली आहे. समाजातील वाईट प्रथा पाहून खिन्न होणारा 'बॅरिस्टर' त्यांनी रेखाटला आहे. बोकाळलेल्या भ्रष्टाचाराने व्यथित होणारे आप्पाजी हे भ्रष्टाचार रोखणाऱ्या व्यक्तीचे प्रातिनिधिक चित्र म्हणून, तर भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तींची प्रतिनिधी म्हणून बाळासाहेब आणि भ्रष्टाचाराला मदत करणाऱ्या व्यक्ती म्हणून संतराम व बाबूराव व्यक्तिरेखा 'सूर्यास्त' मध्ये आल्या आहेत. 'सावित्री' ही नव्या काळातील करिअर करू पाहणाऱ्या स्त्रियांची प्रतिनिधी आहे. याचबरोबर अंबिका ही 'पुरुष' या नाटकातील व्यक्तिरेखा समाजातील निर्भिड, ध्येयवादी स्त्रीचं प्रतिक आहे. 'पुरुष' या नाटकातील अशाच प्रकारच्या व्यक्तिरेखाबद्दल नारायण पेडणेकर म्हणतात,''या नाटकातील पात्रे आजच्या राजकीय व सामाजिक चौकटीतील विविधवर्गीय, वर्णीय आणि जातीय थरांवरील पात्रांचे प्रतिनिधित्व करणारी पात्रे आहेत.''६ मुक्ता ही समाजात आढळणाऱ्या वेड्या व्यक्तींची प्रतिनिधी आहे. तसाच 'महासागर' मधील वसंत,

'नातीगोती' मधील बच्चू, 'पर्याय' मध्ये हुंडाबळी जाणाऱ्या स्त्रिया म्हणून चित्रा, कमल या व्यक्तिरेखा आल्या आहेत. यातील कमल ही व्यक्तिरेखा होणाऱ्या अन्यायाविरूद्ध प्रतिकारासाठी स्त्रियांनी खंबीर व्हावे असे सुचविणारी आहे. लैंगिक असमाधातून आणि कष्ट न करता हाती येणाऱ्या पैशातून पुरुषात येणारा बाहेरख्यालीपणा दळवींनी 'किनारा' मधील शिरुभाऊंच्या रुपाने दाखविला आहे. आपल्या मतिमंद मुलाच्या पालन पोषणासाठी धडपडणाऱ्या बापाचे प्रतिनिधित्व 'नातीगोती' मधील काटदरे करतात. 'लग्न' या विधीशिवाय शरीरसुख घेऊन समस्या निर्माण करणाऱ्या स्त्रिया म्हणून 'लग्न' मधील देविका व 'संसारगाथा' मधील वेणू या व्यक्तिरेखा आल्या आहेत. एखाद्या कुरुप माणसाची व्यथा 'संसारगाथा' मधील दत्ताण्णाच्या रूपाने व्यक्त झाली आहे. दळवींच्या व्यक्तिरेखांचे प्रातिनिधिकत्त्व सांगताना लीला गोविलकर म्हणतात,''तसे पाहिले तर त्यांनी रेखाटलेल्या या व्यक्तिरेखा फार मोठ्या प्रमाणावर प्रातिनिधिक आहेत. सामाजिक वास्तवाचे भान ठेवून लिहिलेल्या या सामाजिक वा राजकीय नाटकात येणाऱ्या व्यक्तिरेखा फार मोठ्या प्रमाणावर प्रातिनिधिक असणे स्वाभाविक आहे.''७यासाठी त्यांनी 'संध्याछाया' मधील नाना नानी, 'पुरुष' मधील अंबिका व 'सूर्यास्त' मधील आप्पाजी यांची उदाहरणे दिली आहेत. अशा पद्धतीने दळवींच्या नाटकांतील व्यक्तिरेखा या प्रातिनिधिक स्वरुपाच्या आहेत. त्या माणसाच्या प्रवृत्तीचेही प्रतिनिधित्व करतात.

४. मनोरुग्ण : दळवींच्या नाटकांत मनोरुग्ण व्यक्तिरेखा आढळतात. या व्यक्तिरेखा कधी सुरुवातीपासून तर कधी नाटकाच्या शेवटी वेड्या झालेल्या आढळतात. मनोरुग्णांचे विविध प्रकारही दळवींनी टिपले आहेत. दळवींच्या नाटकांतील या मनोरुग्णात कधी विक्षिप्तपणा, वेडसरपणा, पूर्ण वेड, भ्रमिष्ठावस्था मतिमंदत्व इत्यादी बारकावे आढळतात. त्यांच्या 'बॅरिस्टर' या नाटकातील 'बॅरिस्टर' हा संपूर्ण नाटकात विक्षिप्तपणे वावरताना आढळतो. त्याच्या मनावर तणाव आढळतो. त्यांच्या 'महासागर' या नाटकातील वसंत हा प्रेमभंगामुळे वेडसर झालेला आढळतो. तर 'सावित्री' या नाटकातील सावित्रीचे मन विचाराने कुरतडत जाते आणि ती भ्रमिष्ठ होऊन त्या अवस्थेत आत्महत्या करते. 'संध्याछाया' मधील नाना व नानीने, 'महासागर' मधील सुमीने, 'पर्याय' मधील माईने, 'अपूर्णांक' मधील कांचनमालेने अशा भ्रमिष्ठावस्था या मनावर होणाऱ्या आघातानेच येतात. हे आघात माणसाला वेडे बनवितात. या अर्थाने दळवींच्या नाटकांतील या सगळ्या व्यक्तिरेखा आल्या आहेत. त्यांच्या 'मुक्ता' या नाटकातील मुक्ता ही वेडी तर 'नातीगोती' या नाटकातील बच्चू हा मतिमंद आहे.

दळवींच्या नाटकांतील या मनोरुग्ण व्यक्तिरेखांबद्दल डॉ. वि. भा. देशपांडे म्हणतात,''दळवींनी निर्मिलेल्या काही व्यक्तिरेखांमध्ये लैंगिकता, कामवासना, वेडगळपणा यातून आलेली मनोविकृती केंद्रवर्ती आहे. त्यामुळे बॅरिस्टर, वसंत यांच्या व्यक्तिरेखाटनाला वेगळे परिणाम लाभले.'' ८मानसिक विकृतीच्या विविध अवस्था पाहिल्या की दळवींच्या प्रत्येक नाटकात त्याचे प्रतिबिंब कसे पडले आहे ते लक्षात येईल. यासाठीच राजीव नाईक म्हणतात,''एकाकीपणाच्या पार पलीकडे पोहचल्यामुळे ठार वेड्या होऊन बसलेल्या व्यक्तींचे दळवींनी वारंवार चित्रण केले. त्यांच्या प्रत्येक कृतीत एक तरी 'वेडे' किंवा केव्हाही वेडे होईल असे पात्र असल्याशिवाय चालत नाही.''९ असे म्हटले आहे. याबाबत डॉ. वि. भा. देशपांडे यांनी मांडलेले ''अशा विषय आशयाच्या

नाटकातील व्यक्तिरेखांची निर्मिती करणे याच आवर्तात दळवी फिरत राहिले नाहीत''१०हे मत योग्य वाटते. वेड्या, भ्रमिष्ट, विक्षिप्त अशा व्यक्तिरेखांशिवाय अनेक प्रकारच्या व्यक्तिरेखा त्यांनी रेखाटल्या आहेत. या सगळ्या व्यक्तिरेखा दळवींनी पाहिलेल्या आहेत. बालपणी, प्रौढपणी त्यांना वेड्या व्यक्तींच्या मागे जाऊन त्यांचे निरीक्षण करण्याचा नाद जडला होता. त्यातून त्यांच्या नाटकांत या व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. या ठिकाणी ही गोष्ट नमूद केली पाहिजे की दळवी काही जाणीवपूर्वक मनोरुग्ण व्यक्तिरेखा आपल्या नाटकांत रेखाटत नाहीत. त्या नकळत त्यांच्या नाटकांत आल्या आहेत. मानसिक विकृतीच्या विविध अवस्था लक्षात घेतल्या की त्यांच्या नाटकांत आलेल्या मनोरुग्ण व्यक्तिरेखांचे स्वरुप लक्षात येईल.

निष्कर्ष :

१.जयवंत दळवी यांच्या नाटकांत वयानुसार वृद्ध, तरुण व बाल व्यक्तिरेखा, मध्यमवर्गीय व सामान्य, प्रातिनिधिक स्वरुपाच्या आणि मनोरुग्ण अशा व्यक्तिरेखा आढळतात.

२.जयवंत दळवी यांच्या नाटकांत व्यक्तिरेखांची अशी विविधता आढळते.

संदर्भ :

१.म. द. हातकणंगलेकर, जयवंत दळवी यांचे नाट्यमय यश ,शब्दश्री, दिवाळी अंक, १९६४, पृ. ६८.

२.भालचंद्र खांडेकर ,जयवंत दळवींची नाटके, नीहारा , १९८८, पृ.६६.

३.तत्रैव पृ.६६

४.तत्रैव पृ.६६

५.जयवंत दळवी ,स्त्रीपुरुष संबंध न संपणारा शोध,चतुरंग, लोकसत्ता, पुणे ,१३ मार्च १९९३, पृ. १.

६. नारायण पेडणेकर, जाणिवांचा प्रचंड बारूद करणारे नि युगदर्शी नाटक –पुरुष ,सकाळ, मुंबई, २४ सप्टेंबर १९८२,पृ.६

७.लीला गोविलकर ,नाटककार जयवंत दळवी ,साहित्य सूची, एप्रिल १९८५, पृ.३६

८.देशपांडे वि.भा.,मराठी नाटक आणि रंगभूमी : स्वातंत्र्योत्तर काळ ,पुणे,१९९२,पृ.७२ व ७३

९.तत्रैव पृ. ७३

१०.तत्रैव पृ. ७३